**RNI No. MAHBIL /2009/40124**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष १२, अंक १६]                    सोमवार, जून २२, २०२६/आषाढ १, शके १९४८                    [पृष्ठे ६, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ३५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **२२ जून, २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XXXIII OF 2026.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND
SERVICES TAX ACT, 2017.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३.**

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

२०१७ चा महा. ४३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नेमून देण्यात येतील.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (ख) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— २०१७ चा महा. ४३.

"(ख) पुरवठा करण्यात आल्यानंतर, अशा सवलतीसाठी, पुरवठादाराकडून जमापत्र काढण्यात आले असेल आणि कलम ३४ च्या तरतुदींनुसार, पुरवठ्याच्या प्राप्तकर्त्याने अशा सवलती इतकी निविष्टी कराची जमा रक्कम परत केलेली असेल तर.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "दोन्हींची जेथे कमतरता आढळून येते" या मजकुरानंतर, "किंवा जेथे कलम १५ च्या पोट-कलम (३) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेली सवलत दिलेली असेल" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये,-

(क) पोट-कलम (६) मधील, "वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या शून्याधारित पुरवठ्यामुळे" या मजकुरानंतर, "किंवा पोट-कलम (३) च्या पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये न वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (१४) मधील, "पोट-कलम (५) किंवा पोट-कलम (६) अन्वये" या मजकुरानंतर, "ज्या प्रकरणांमध्ये भारताबाहेर निर्यात केलेल्या वस्तूंवर कर प्रदान करून कर परताव्याचा दावा केला असेल त्या प्रकरणांव्यतिरिक्त" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

वस्तू व सेवा कर परिषदेद्वारे, वस्तू व सेवा कर कायद्यांमध्ये आवश्यक सुधारणा करणारे अनेक निर्णय तिच्या बैठकांमध्ये घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार, संसदेने वित्त अधिनियम, २०२६ (२०२६ चा ४) द्वारे केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम (२०१७ चा १२) यामध्ये सुधारणा केलेली आहे. उपरोक्त बैठकीमध्ये वस्तू व सेवा कर परिषदेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम,२०१७ (२०१७ चा महा. ४३) यांच्या तरतुदींच्या प्रयोज्यतेमध्ये एकरूपता राखण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात सुधारणा करणे इष्ट आहे.

**२.** प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) विक्री-पश्चात सवलत करारनाम्यासोबत जोडण्याची आवश्यकता दूर करण्यासाठी आणि जेथे प्राप्तकर्त्याने निविष्टी कराची जमा रक्कम परत केलेली असेल तेथे, कलम ३४ अन्वये जमापत्र काढण्यासाठी निर्देश देण्यासाठी कलम १५ च्या पोट-कलम (३) चा खंड (ख) बदली दाखल करणे;

(दोन) जमापत्र व नावेपत्राशी संबंधित उक्त तरतुदींमधील कलम १५ चा संदर्भ समाविष्ट करण्यासाठी कलम ३४ च्या पोट-कलम (१) मध्ये सुधारणा करणे;

(तीन) व्यस्त शुल्काच्या संरचनेतून उद्भवलेल्या परताव्यांचा तात्पुरत्या स्वरूपात परतावा देण्याच्या सुविधेत वाढ करण्यासाठी कलम ५४ च्या पोट-कलम (६) मध्ये सुधारणा करणे;

(चार) कराच्या प्रदानासह भारताबाहेर निर्यात केलेल्या वस्तूंच्या संबंधातील परतावा दाव्यांच्या मंजुरीसाठी असलेल्या मर्यादा काढून टाकण्यासाठी कलम ५४ च्या पोट-कलम (१४) मध्ये सुधारणा करणे.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,<br>दिनांक १५ जून २०२६.

**देवेंद्र फडणवीस,**<br>मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपवण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपवण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :—

**खंड १(२).—** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी भूतलक्षी किंवा भविष्यलक्षी प्रभावाने ज्या दिनांकास अंमलात येतील तो दिनांक, आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपवण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव सामान्य स्वरूपाचा आहे.

## वित्तीय ज्ञापन.

वस्तू व सेवा कर परिषदेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याकरिता आणि केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम,२०१७ (२०१७ चा १२) आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम,२०१७ (२०१७ चा महा. ४३) यांच्या तरतुदींच्या प्रयोज्यतेतील एकरूपता राखण्यासाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम,२०१७ (२०१७ चा महा. ४३) याच्या विविध कलमांमध्ये विवक्षित सुधारणा केल्या आहेत.

या विधेयकात, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाच्या कोणत्याही तरतुदीचा अंतर्भाव नाही.

**भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस**

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२६ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २२ जून, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.